# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २१ जुलै, २०२३ / आषाढ ३०, १९४५ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री** | |
| **(३)** | **उद्योग मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(५)** | **शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री** | |
| **(६)** | **अन्न व औषध प्रशासन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २३**

---

### कवठेमहांकाळ (जि. सांगली) येथे गुटख्याची होत असलेली तस्करी

**(१) * ६६०१६ श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुटखा बंदी असतांना सांगली जिल्हयातील कवठेमहांकाळ येथे सुमारे दीड कोटी रुपयांचा गुटखा स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा व पोलिसांनी संयुक्त कारवाई करून जप्त केला असल्याचे माहे एप्रिल- मे, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात जप्त करण्यात आलेला गुटखा अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांचाच असल्याचे तपासात समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी देखील संबंधित अधिकाऱ्यांनी कोटयवधी रुपयांचा गुटखा तस्करी करुन राज्यात विक्रीसाठी आणला असल्याचा आरोप सामाजिक संघटनांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करणे तसेच अवैध गुटखा विक्री रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धर्मरावबाबा आत्राम :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सांगली व कवठेमहांकाळ पोलीसांनी दि.३०-०४-२०२३ रोजी केलेल्या संयुक्त कारवाईत पानमसाला, गुटखा व सुगंधित तंबाखूचा एकूण रु.१,१४,०९,७००/- किंमतीचा साठा जप्त केला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) या प्रकरणी प्रतिबंधित अन्नपदार्थांची वाहतूक केल्यामुळे भा.द.वि. कलम ३२८, १८८, २७२, २७३ नुसार कवठेमहांकाळ पोलीस स्टेशन जि. सांगली येथे संबंधित वाहन चालक आणि अन्न व औषध प्रशासनातील सोलापूर कार्यालयातील अन्न सुरक्षा अधिकारी व इतर यांच्याविरुध्द फिर्याद दाखल करण्यात आली आहे. त्यानुषंगाने, दि.२४.०५.२०२३ रोजी संबंधित अन्न सुरक्षा अधिकारी यांना तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. तसेच, त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे.

प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या वाहतूकीसाठी व साठवणूकीसाठी पुनर्वापर न होण्याकरिता सदर वाहन जप्त करण्याबाबत तसेच, सदर जागा/गोदाम सील करण्याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, गुटखा, पानमसाला व इतर तत्सम प्रतिबंधित अन्न पदार्थाची वाहतूक करणा-या वाहनांचा वाहतूकीचा परवाना तसेच वाहन चालकाचा परवाना रद्द करणेबाबत संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाला सूचित करण्याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, अवैध गुटखा विक्री रोखण्यासाठी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व नियम २०११ मधील तरतुदींनुसार कारवाई करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**राज्यात तंबाखू मिश्रीत पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२) * ६९०१३ श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.माधवराव पवार (हदगाव) श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री. संजय सावकारे (भुसावळ), श्री. मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री. शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तंबाखू मिश्रीत पदार्थ विकण्यास शासनाने बंदी घातली असतांनाही विविध कंपन्या तंबाखू मिश्रीत गुटखा सर्रासपणे विक्री करीत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तरुण युवकांसोबत महिला देखील गुटख्याच्या आहारी जात असून आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तंबाखू मिश्रीत पदार्थ, गुटखा उत्पादन करणाऱ्या तसेच विक्री करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) महाराष्ट्रामध्ये गुटखा उत्पादन करण्यास प्रतिबंध असून शेजारच्या राज्यांमध्ये गुटख्याचे उत्पादन केले जाते त्यांच्यावर महाराष्ट्र शासनाकडून थेट कारवाई करणे शक्य नाही. तथापि, प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या वाहतूकीसाठी व साठवणूकीसाठी पुनर्वापर न होण्याकरिता सदर वाहन जप्त करण्याबाबत तसेच, सदर जागा/गोदाम सील करण्याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, गुटखा, पानमसाला व इतर तत्सम प्रतिबंधित अन्न पदार्थाची वाहतूक करणा-या वाहनांचा वाहतूकीचा परवाना तसेच वाहन चालकाचा परवाना रद्द करणेबाबत संबंधित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाला सूचित करण्याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, अवैध गुटखा विक्री रोखण्यासाठी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व नियम २०११ मधील तरतुदींनुसार कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शालेय विद्यार्थ्यांच्या गणवेश वाटपाचे काम स्थानिक पातळीवर करण्याबाबत**

**(३) * ६४६८८ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय शाळांमध्ये शिकणाऱ्या पहिली ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना राज्यस्तरावरुन मोफत गणवेशाचे कापड व इतर शालेय साहित्य पुरवठा करण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गणवेशाची रंगसंगती ठरविण्याची व गणवेश वेळेत उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी स्थानिक पातळीवरच ठेवावी, राज्यस्तरावरुन गणवेश वाटपाच्या निर्णयाचा पुनर्विचार करावा तसेच प्रति विद्यार्थी दोन गणवेशासाठी ६०० रुपयांऐवजी १००० रुपयांचा निधी देण्यात यावा अशा मागण्या अनेक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समग्रशिक्षा अभियानातून मोफत गणवेशाचा निधी देताना तो केवळ दारिद्रय रेषेखालील व इतर राखीव वर्गवारीतील विद्यार्थ्यांनाच देण्यात येत असून राज्यातील शाळा सुरु होऊनही अनेक विद्यार्थ्यांना अद्यापही गणवेश व इतर शालेय साहित्याचे वाटप झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

प्रस्तुत विषयाबाबत मा. विरोधी पक्षनेते विधानपरिषद यांनी दि.१७ मे, २०२३ रोजी निवेदन दिले आहे.

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामध्ये दोन्ही गणवेशाचा लाभ शाळा व्यवस्थापन समितीव्दारे देण्यात येत आहे.

(३) अंशत: खरे आहे.

समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना गणवेशाकरीता आवश्यक असणारा निधी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषेदमार्फत वितरीत करण्यात आला आहे. तसेच, राज्य शासनाच्या मोफत गणवेश, बुट व पायमोजे योजनेंतर्गतचा निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) शासनाने दिलेल्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत सुरु आहे.

-----------------

## राज्यातील अनधिकृत शाळांवर कारवाई करण्याबाबत

**(४) * ६४६४३ श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.शेखर निकम (चिपळूण), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण विभागामार्फत विविध शाळांचे सर्वेक्षण करण्यात आले असता सुमारे १३०० शाळांपैकी ८०० शाळा कागदपत्रातील त्रुटी, नुतनीकरणाचा अभाव तसेच आवश्यक त्या मान्यता न घेतल्यामुळे अनधिकृत ठरविण्यात आल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यात सीबीएसई, आयसीएसई आणि आयबी मंडळासह राज्यातील महानगरपालिका व जिल्हापरिषद स्तरावरील शाळांचा देखील समावेश असून यात हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळा बंद करुन शाळा चालकांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश शिक्षण उपसंचालकांनी दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामुळे हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असून, ज्या शाळा बंद करण्यात आल्या आहेत त्यातील विद्यार्थ्यांचे अन्य शाळांमध्ये समायोजन देखील अद्याप झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शिक्षणाधिकाऱ्यांकडून नियमितपणे तपासणी व दंड वसुली होत नसून अधिकाऱ्यांच्या संगनमताने अनधिकृत शाळांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशा शाळांमधील शैक्षणिक नुकसान टाळणे, विद्यार्थ्यांचे समायोजन करणे, अनधिकृत शाळांची यादी प्रसिध्द करणेबाबत तसेच या अनधिकृत शाळांवर आणि यात सहभागी असणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) राज्यातील खाजगी व्यवस्थापनाद्वारे ६६१ शाळा या अनधिकृतपणे सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) मान्यता रद्द केलेल्या शाळांमध्ये खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांचा समावेश आहे. सदर अनधिकृत शाळांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका/ जिल्हा परिषद) यांच्यामार्फत सुरू असलेल्या शाळांचा समावेश नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) विद्यार्थांचे अन्य शाळांमध्ये समायोजन करण्यात आले आहे.
(५) हे खरे नाही.
(६) शासन मान्यता, शासन ना-हरकत प्रमाणपत्र, परीक्षा मंडळ संलग्नता, इ. नसणा-या शाळांवर कार्यवाही करण्याचे निर्देश क्षेत्रीय अधिका-यांना वेळोवेळी देण्यात येत आहेत. राज्यातील अनधिकृत शाळांवर दंड आकारणे, फौजदारी गुन्हा दाखल करणे व गंभीर प्रकरणांमध्ये संबंधित शाळा कायमस्वरूपी बंद करण्याची कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच, राज्यातील शाळांच्या प्रमाणपत्रांची वैधता तपासण्यासाठी शिक्षण सहसंचालक, प्रशासन अंदाज व नियोजन यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात गुढीपाडवा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून देण्यात येणाऱ्या आनंदाच्या शिध्याचे वाटप प्रलंबित असल्याबाबत

**(५) * ६४५९७ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुढीपाडवा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिधापत्रिकाधारकांना १०० रुपयात आनंदाचा शिधा वाटप करण्याचा निर्णय शासनाने माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान घेतला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक ठिकाणी या शिध्याचा पुरवठा वेळेत झालेला नसून केवळ २९ टक्के नागरिकांनाच शिधा वाटप झाले असून अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाच्या धान्याचे वाटप झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात या योजनेंतर्गत निकृष्ट दर्जाचे धान्य तसेच धान्याचा वेळेत पुरवठा होत नसताना या योजनेच्या जाहिरातींवर मात्र शासन कोटयवधी रुपये खर्च करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, डोंगरगाव व नेरी (ता. मोहाडी, जि. भंडारा) येथे आनंदाच्या शिध्यामध्ये मेलेले उंदीर आढळून आले असून नेरी येथे निकृष्ट दर्जाच्या धान्याचे वाटप करण्यात आले असल्याने त्यांनी याबाबत तहसीदारांकडे तक्रार केली असल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती इत्यादी सणांनिमित्त मंजुर करण्यात आलेल्या १,५८,९७,५७८ शिधाजिन्नस संचांपैकी आजमितीस १,५७,७३,७२८ शिधाजिन्नस संचांचे (९९.२२%) पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरण करण्यात आले आहे.

शिधाजिन्नस संचात समाविष्ट शिधाजिन्नस FSSAI मानकाची पूर्तता करीत असल्याचे NABL अधिकृत प्रयोगशाळेचे प्रमाणपत्र कंत्राटदाराकडून प्राप्त करुन घेऊन तद्नंतरच शिधाजिन्नस संच स्विकारण्यात आले आहेत.
(३) हे खरे नाही.

राज्यात गुढीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती इ. सणांनिमित्त वितरीत करण्यात आलेल्या "आनंदाचा शिधा" या योजनेचा लाभ सुनिश्चित करण्यासाठी जनजागृतीकरीता एकूण रूपये ४०,२५,९०६/- (अक्षरी रूपये चाळीस लक्ष पंचवीस हजार नऊशे सहा फक्त) इतका खर्च झालेला आहे.
(४) शिधाजिन्नस संचाच्या निकृष्ट दर्जाच्या अनुषंगाने तहसीलदार, मोहाडी यांच्याकडे तक्रार प्राप्त झाली होती. तथापि, तहसीलदार, मोहाडी यांनी केलेल्या चौकशीनुसार शिधाजिन्नस संचात मेलेला उंदीर आढळून आलेला नाही.
(५) सदर तक्रारीच्या अनुषंगाने तहसीलदार, मोहाडी यांनी केलेल्या चौकशीनुसार मोहाडी तालुक्यातील काही रास्तभाव दुकानदारांना खराब चनाडाळीची पाकिटे प्राप्त झाली होती. परंतु, सदर चनाडाळ पाकिटे बदलून देण्यात आली आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यार्थ्यांचे संच मान्यतेच्या प्रक्रियेत आधारकार्ड अद्ययावत करणेबाबत

**(६) * ६५७७२ श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुदानित शाळांना संच मान्यता तसेच वेतन अनुदानासाठी विद्यार्थ्यांचे आधारकार्ड अद्ययावत करणे बंधनकारक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांचे आधारकार्ड तपासले जात असून या तपासणीत एकुण १ कोटी ९१ लाख विद्यार्थ्यांपैकी सुमारे २५ लाख विद्यार्थ्यांचे आधारकार्ड वैध आढळले नसून सुमारे ४४ लाख विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांक नोंदीमध्ये तफावती असल्याचे निदर्शनास आले, आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेक विद्यार्थ्यांनी अद्यापही आधारकार्ड काढले नसून अनेक शाळांना आधारकार्ड नोंदणी करतांना संकेतस्थळावर विविध तांत्रिक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाच्या सरल पोर्टलवरील त्रुटींमुळे विद्यार्थी प्रत्यक्ष शाळेच्या पटावर असून देखील शिक्षण विभागाच्या अधिकृत नोंदीत नसल्यामुळे विद्यार्थी विविध शैक्षणिक अनुदान व सोयी-सुविधांपासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, संच मान्यता ठरवितांना वैध-अवैध विद्यार्थी संख्या न ठरविता ती आधारकार्डाच्या संख्येवर ठरविण्यात यावी अशी मागणी शैक्षणिक क्षेत्रातून होत आहे, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अशा तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.
(४) हे खरे नाही.
(५) अशा प्रकारची निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत.
(६) सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने क्षेत्रिय कार्यालयाकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत. अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यार्थी शालेय पोषण आहारापासून वंचित असल्याबाबत

**(७) * ६५५२१ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा परिषद तसेच अनुदानित शाळांमधील ८ वी पर्यंतचे ८८ लाखांहून अधिक विद्यार्थी शालेय पोषण आहारापासून वंचित असल्याचे माहे मार्च,२०२३ च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात विशेषत: पुणे, कोल्हापूर, अमरावती या जिल्हयांमध्ये अनेक ठिकाणी अनियमित व निकृष्ट दर्जाचा धान्य पुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक ठिकाणी पोषण आहाराचा पुरवठा बंद असल्यामुळे यासंदर्भातील निविदा प्रक्रिया तात्काळ राबवून नियमित धान्य पुरवठा करुन पोषण आहार सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.

(३) सन २०२३-२५ या कालावधीसाठी ई-निविदा प्रक्रिया माहे मार्च-२०२३ मध्ये पूर्ण करुन जिल्हानिहाय पुरवठेदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर पुरवठेदारामार्फत शाळांना तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठा नियमितपणे सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात मोठ्या प्रमाणात शाळाबाह्य मुलांची संख्या वाढत असल्याबाबत**

**(८) * ६४७४६ अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.संतोष दानवे (भोकरदन), अॅड.राहूल कुल (दौंड), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षात देशभरात ९ लाखांहून अधिक मुले-मुली शाळाबाह्य आढळले असून यामध्ये राज्यातील ८,४७८ मुले आणि ७,२२८ मुलींचा समावेश असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळा बाह्य मुला-मुलींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण हक्क कायदा (आरटीई), समग्र शिक्षण योजना, बेटी बचाव-बेटी पढाव व मध्यान भोजन यासारख्या विविध योजना राबविल्या जात असतानाही लाखो मुले-मुली औपचारिक शिक्षण प्रवाहातून अद्याप बाहेर आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात शाळाबाह्य मुलांची संख्या कमी करण्यासाठी तसेच त्यांचेकरिता अस्तित्वात असलेल्या योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही. शासन निर्णय दिनांक २३ जून, २०२२ नुसार ०३ ते १८ वयोगटातील शाळाबाह्य व स्थलांतरीत मुलांना शिक्षणाच्या मुळ प्रवाहात दाखल करण्यासाठी "मिशन झिरो ड्रॉप आऊट" या नावाने दिनांक ०५ जुलै, २०२२ ते दिनांक २० जुलै, २०२२ या कालावधीमध्ये मोहिम राबविण्यात आली. सदर मोहिमेत सन २०२२-२३ मध्ये राज्यात ४६५० मुले व ४६७५ मुली असे एकूण ९३०५ बालके शाळाबाह्य आढळून आली आहेत.
(२) हे खरे नाही. शाळा बाह्य मुला-मुलींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण हक्क कायदा (आरटीई), समग्र शिक्षण योजना, बेटी बचाव-बेटी पढाव व मध्यान्ह भोजन यासारख्या विविध योजना प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. सदर योजनांमुळे शाळाबाह्य मुलांचे प्रमाण कमी होत आहे. सन २०२२-२३ मध्ये आढळून आलेल्या ९३०५ बालकापैकी ९००४ बालके शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात आली आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दसाणे (ता.मालेगाव, जि.नाशिक) येथे अवैध प्लॅस्टिक कारखाने सुरु असल्याबाबत**

**(९) * ६५९९८ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दसाणे (ता.मालेगाव,जि.नाशिक) येथे ५५ पेक्षा अधिक अवैध प्लॅस्टिक कारखाने सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्लॅस्टिक कारखान्यातून निघणाऱ्या धुरामुळे प्रदुषण निर्माण होऊन नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अवैध प्लॅस्टिक कारखान्यांना ग्रामपंचायतीकडून ना-हरकत प्रमाणपत्रही देण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अवैध प्लॅस्टिक कारखान्यांवर आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) (३) व (४) सदर उद्योगात टाकाऊ प्लॅस्टिक पासून गिट्टी, प्लॅस्टिक पाईप व इतर उत्पादने हे विद्युत उपकरणाद्वारे केले जाते. उद्योगामध्ये कोणत्याही प्रकारच्या जळावू इंधनाचा वापर केला जात नाही. तसेच धुर निर्माण होत नाही.

सदर उद्योगांना दसाणे ग्रामपंचायतीने ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे. त्यास अनुसरुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने उद्योग उभारणीसाठी समंती पत्र काही अटी व शर्तीसह प्रदान करण्यात आले.

तथापि, सदर ग्रामपंचायतीने दिनांक ०७ मे, २०२३ रोजी सदरचे परवानगी नाकारण्याचे व उद्योग अनधिकृत चालू असल्याचे पत्र महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिले आहे.

त्याअनुषंगाने दिनांक ११ जुलै, २०२३ रोजी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने स्थळ पहाणी केली. सदर पहाणी दरम्यान १९ उद्योग सुरु असून ७ ते ८ उद्योग उभारणीचे काम सुरु असल्याचे आढळून आले. तसेच सदर उद्योगांनी उत्पादन सुरु करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमती पत्र घेतले नसल्याचे आढळून आले सबब, सदर उद्योगांना उद्योग बंद का करण्यात येऊ नये अशी कारणे दाखवा नोटीस दिनांक ११ जुलै, २०२३ रोजी बजावली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिक येथील महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी केलेला गैरव्यवहार**

**(१०) * ६७८४७ श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील मालेगांव महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाचे निलंबित प्रभारी प्रशासन अधिकारी, श्री.फ्रांसिस चव्हाण यांनी अन्य अधिकाऱ्यांच्या संगनमताने अनुकंपा तत्वावर बेकायदेशीररित्या शिक्षक भरती करण्यासह शिक्षकांच्या वेतनासाठी वारंवार पैसे काढून सुमारे ३ कोटीहून अधिक रक्कमेचा गैरव्यवहार केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन श्री.चव्हाण यांच्यासह इतर अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा अशी मागणी दिनांक १८ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. अशा प्रकारच्या मागणीचे पत्र या विभागास प्राप्त झालेले नाही.

(३) शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक),

जि.प. धुळे यांनी केलेल्या चौकशीअंती प्राप्त झालेल्या अहवालानुसार श्री.फ्रांसिस चव्हाण, तत्का.प्रशासन अधिकारी, मालेगाव महानगरपालिका यांना शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांच्या दि.१२.०५.२०२३ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### राज्यात दारिद्र्य रेषेखालील नागरिकांच्या वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेत वाढ करण्याबाबत

**(११) * ६४६१४ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासनामार्फत अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत दारिद्र्य रेषेखालील नागरिकांना शिधावाटप दुकानातून माफक दरात अन्नधान्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यासाठी १३ वर्षापूर्वीचीच वार्षिक उत्पन्नाची मर्यादा लागू असून ग्रामीण भागात रुपये ४४ हजार तर शहरी भागात रुपये ५९ हजार इतकी उत्पन्न मर्यादा निश्चित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत वाढती महागाई पाहता या उत्पन्न मर्यादेत अनेक गरजू नागरिक पात्र ठरत नसल्यामुळे त्यांना या योजनेचा लाभ घेता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यास्तव विहित उत्पन्न मर्यादेत वाढ करुन महागाईच्या तुलनेत त्याची निश्चिती करण्याची आवश्यकता असून अनेक नागरिक तसेच मुव्हमेंट फॉर पीस ॲन्ड जस्टीस या संघटनेने शासनाकडे तशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) होय. हे खरे आहे.
(३) राज्यात दिनांक १ फेब्रुवारी, २०१४ पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर अधिनियमांतर्गत केंद्र शासनाकडून महाराष्ट्र राज्यासाठी ७००.१६ लक्ष इतका लाभार्थी इष्टांक निश्चित करण्यात आला आहे. सदर इष्टांकाच्या मर्यादेत लाभार्थ्यांची निवड करणे अपरिहार्य असल्यामुळे दि.१७.१२.२०१३ च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेकरिता लाभार्थ्यांची निवड करण्याकरिता ग्रामीण व शहरी भागाकरिता अनुक्रमे रु.४४,०००/- व रु.५९,०००/- इतकी वार्षिक उत्पन्न मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत योग्य व गरजू लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी दि.१५.९.२०२१ च्या शासन निर्णयान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करून सवलतीतील अन्नधान्याचा लाभ मिळण्यापासून वंचित राहिलेल्या नवीन पात्र लाभार्थ्यांचा समावेश राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत करण्यात येत आहे. राज्यातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारकांची निवड करण्याकरिता दि.१७.१२.२०१३ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादेत बदल करण्याचा कोणताही प्रस्ताव सद्य:स्थितीत शासनाच्या विचाराधीन नाही.
(४) दारिद्र्य रेषेखालील नागरिकांच्या वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादेत वाढ करण्याची आवश्यकता असल्याबाबत मुव्हमेंट फॉर पीस ॲन्ड जस्टीस या संघटनेकडून निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

--------------------------

**रत्नागिरी जिल्हयातील बारसू येथे रिफायनरी प्रकल्प उभारण्याचा शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबत**

**(१२) * ६६४८९ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बारसू (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथे हरित तेल शुध्दीकरण प्रकल्प उभारण्याची घोषणा शासनाने केली असून या प्रकल्पात तेथील रहिवाशांच्या व शेतकऱ्यांच्या जमिनी जाणार असल्यामुळे स्थानिक नागरिकांनी या प्रकल्पाला विरोध केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक नागरिकांचा विरोध असतानाही प्रशासनाने दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी माती परिक्षणासाठी ड्रिलींगच्या कामाला सुरुवात केल्यामुळे तेथील नागरीकांनी या कामासाठी विरोध केला असता तेथे संचारबंदी लागू करुन निदर्शने करणाऱ्या नागरीकांवर लाठीचार्ज करण्यात आला असून घटनास्थळी वार्तांकन करत असलेल्या माध्यमांच्या प्रतिनिधींनाही पोलिसांनी बळजबरीने हुसकावून लावले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बारसू परिसरातील युनेस्को नॉमिनेटेड कातळ शिल्प असून सदर प्रकल्पामुळे हे कातळ शिल्प स्थळ धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकल्पासंदर्भात अगोदर स्थानिक नागरिकांना पुर्णपणे विश्वासात घेवून नंतरच अंतिम निर्णय घेण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
मे. रत्नागिरी रिफायनरी व पेट्रोकेमिकल कंपनीकडून दि.२४/०४/२०२३ ते १२/०५/२०२३ या कालावधीत राजापूर तालुक्यातील बारसू परिसरात माती परीक्षणाचे (ड्रिलिंगचे) कामकाज करण्यात आले. जिल्हा प्रशासनाकडून जमावबंदी आदेश लागू करण्यात आले होते. परंतु, नागरिकांवर लाठीचार्ज करण्यात आलेला नाही. पत्रकारांना हुसकावून लावण्यात आले नाही.
(३) अंशत: खरे आहे.
प्रस्तावित रिफायनरीसाठी भूसंपादन प्रक्रिया राबविताना पुरातत्व विभागाचे याबाबतचे धोरण विचारात घेवून पुरातत्व विभागाशी संबंधित क्षेत्र वगळून भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येईल.
(४) दि. २७.०४.२०२३ रोजी रिफायनरी समर्थक व रिफायनरी विरोधक यांची पर्यावरण तज्ञासोबत बैठक पार पडली. सदर बैठकीमध्ये रत्नागिरी रिफायनरी पेट्रोकेमिकल लिमिटेड कंपनीबाबत शंका, तक्रारी तसेच पर्यावरण विषयक गैरसमज यांवर तज्ञ व्यक्तींकडून प्रश्न उत्तर स्वरूपात चर्चा करून निरसन करण्यात आले.
तसेच, स्थानिक प्रशासनातर्फे रिफायनरीसाठी प्रस्तावित गावांमध्ये जाऊन नागरिकांच्या आक्षेपांसंदर्भात जनजागृती व प्रबोधन करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तळेघर आणि कादवण (ता.दापोली, जि.रत्नागिरी) या दोन गावांना जोडणाऱ्या रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१३) * ६६४५८ श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळेघर आणि कादवण (ता.दापोली, जि.रत्नागिरी) या दोन गावांना जोडणाऱ्या रस्त्यापैकी कुंबळे-तिडे-तळेघर-कादवण-महाडकडे जाणाऱ्या कादवण-तळेघर दरम्यानच्या १२०० मीटर रस्त्याचे काम मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तळेघर कडून कादवण-लाटवण पंचक्रोशीकडे जाण्यासाठी केवळ ३ किलोमीटरच्या अंतरासाठी नागरिकांना १० किलोमीटर जादा अंतराचा वळसा घालून प्रवास करावा लागत असल्याने वेळ व पैशाचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करुन यास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) व (२) सदरची कामे मंडणगड तालुक्यातील असून प्रस्तुत कामांना मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या टप्पा-२ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.सद्यस्थितीत काम निविदा स्तरावर आहे.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

(४) निरंक

-----------------

## राज्यातील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१४) * ६४८२६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), डॉ.राहूल आहेर (चांदवड), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय व खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांमधील शिक्षकांची सुमारे ३० हजार पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभियोग्यता आणि बुध्दीमापन चाचणीचा निकाल जाहिर होऊनही प्रत्यक्ष भरती प्रक्रिया सुरु न झाल्यामुळे चालु शैक्षणिक वर्षात शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे नुकसान होत असून कित्येक शाळांमध्ये एकही शिक्षक उपलब्ध नसल्याची परिस्थिती निर्माण झाली असून भरतीसाठी पात्र उमेदवारांमध्ये देखील असंतोषाचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर जिल्हा परिषदेच्या ५१, सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील ११६ जिल्हा परिषद शाळांमध्ये ७२, चांदवड (जि.नाशिक) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये १४५ तसेच पुणे जिल्हा परिषद शाळांमध्ये १२३ रिक्त पदे असून यापैकी भोर (जि.पुणे) येथे सर्वाधिक म्हणजे ४४ शाळांमध्ये एकही शिक्षक नसून कोकणातही सुमारे पाच हजार पदे रिक्त असल्याने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील डी.एड. बेरोजगार संघर्ष समितीच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर माहे मार्च, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात बेमुदत उपोषण सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्राथमिक शिक्षकांच्या भरतीबाबत मुद्देनिहाय अहवाल सादर करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्य शासनास माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरील पदे माहे एप्रिल, २०२३ च्या अखेरपर्यंत भरणेबाबत मा. शालेय शिक्षण मंत्री यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२३ मध्ये आश्वासन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

आगामी भरतीसंदर्भात न्यायालयीन प्रकरण उद्भवले असल्याने भरतीस होणारा संभाव्य विलंब विचारात घेऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता शासन पत्र दिनांक 07.07.2023 अन्वये सेवानिवृत्त शिक्षकांमधून शाळांमध्ये मानधनावर शिक्षक नियुक्त करणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत.
सिंधुदूर्ग जिल्ह्यातील डी.एड बेरोजगार संघर्ष समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदूर्ग येथे आंदोलन झाले आहे.
(४) व (५) होय, हे खरे आहे.
(६) शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील मुरबाड - कल्याण या राष्ट्रीय माळशेज महामार्गावरील वैशाखरे नदीवरील पुलाची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(१५) * ६६८९९ श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मुरबाड-कल्याण राष्ट्रीय महामार्गावरील वैशाखरे नदीवरील पूल कालबाह्य व वाहतूकीसाठी धोकादायक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पुलावर कायम वाहनांची वर्दळ सुरु असून रात्रीच्या वेळी वाहनांचे अपघात होणे तसेच भविष्यात महाडच्या पुल दुर्घटनेची पुनरावृत्ती होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या पुलावरील सततच्या वाहतूकीमुळे पुलाचे कठडे कोसळण्याचे प्रकार सातत्याने घडत असूनही प्रशासनाकडून तेथे बांबू लावून केवळ तात्पूरती तसेच धोकादायक व्यवस्था केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर पुलाच्या पुनर्बांधणीची मागणी स्थानिक ग्रामस्थ तसेच वाहन चालक गत तीन वर्षांपासून सातत्याने मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, ठाणे जिल्हा, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे आदींकडे लेखी निवेदनाद्वारे करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पुलाची तात्काळ पुनर्बांधणी करुन यातील दोषींवर कारवाई होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) ठाणे जिल्हयातील मुरबाड-कल्याण या राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून राष्ट्रीय महामार्ग मंडळ, कोकण मार्फत प्रगतीपथावर आहे.

सदर महामार्गावरील वैशाखरे नदीवरील पूल कालबाह्य झाला आहे. तथापी पुलाची बाह्य पाहणी केली असता सद्यस्थितीत पुल धोकादायक स्थितीत आढळून आला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

सदर पुलाचे कठडयाचे काम करताना मजुरांच्या सुरक्षा कारणास्तव तात्पुरते स्वरुपाचे बांबु लावले होते.

(४) हे खरे नाही. या विभागास असे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(५) केंद्र शासनाचा वार्षिक आराखडा २०२२-२३ अंतर्गत कल्याण-मुरबाड निर्मल राष्ट्रीय महामार्ग ६१ च्या नुतनीकरणाच्या कामामध्ये वैशाखरे नदीवरील कणकविरा पुलाची पुर्नबांधणी करण्याचे काम समाविष्ट आहे. सदर कामाची निविदा प्रक्रीया प्रगतीपथावर आहे. तथापि सद्यस्थितीत या पुलावरील वाहतुक सुरळीत चालू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील अपंगाच्या शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती करताना झालेली अनियमितता**

**(१६) * ६४५७३ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनाच्या समन्वयाने शासनाने अपंग समावेशित शिक्षण योजनेअंतर्गत नियमित शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विशेष युनिट सुरु करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अनेक जिल्ह्यात अपंग समावेशित शिक्षण योजनेत माध्यमिक शाळांमध्ये भरती झालेल्या आणि ही योजना बंद झाल्यानंतर पदस्थापना मिळालेल्या सुमारे ९० टक्के शिक्षकांची भरतीच बोगस असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू नियुक्त करण्यात आलेल्या बोगस शिक्षकांनी संबंधित योजनेतील वेतन, वेतनेत्तर व विविध विभागात पदस्थापनेवर मिळालेल्या शासकीय लाभाचा फायदा घेतल्यामुळे त्यांच्यावर फसवणूक केल्याप्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, राज्यातील अपंगाच्या अनुदानित विशेष शाळा/कार्यशाळांना शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी भरतीसाठी नियमबाह्य ना-हरकत प्रमाणपत्रे देऊन वित्तीय व प्रशासकीय अनियमितता केलेल्या दोषी अधिकाऱ्यांवर प्रशासकीय व फौजदारी स्वरुपाची कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सन २०२२ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनातील विधानपरिषद नियम ९३ अन्वये उपस्थित झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने सदर प्रकरणी प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी समितीने दि. ०६.१०.२०२२ रोजी शासनास आपला अहवाल सादर केलेला आहे. तसेच, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल अवमान याचिका क्र. २६४/२०१७ व संलग्न याचिकां प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ०१.०७.२०२२ रोजीचे आदेश व चौकशी समितीचा अहवाल यानुसार नैसर्गिक न्याय तत्वानुसार संबंधीत शिक्षकांना विभागीय अध्यक्ष, विभागीय शिक्षण मंडळ यांच्या स्तरावर सुनावणीची संधी देण्यात आली असून, पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### राज्यातील रायगड व मुंबईसह अनेक ठिकाणी होत असलेली कॅफेनयुक्त एनर्जी ड्रिंक्सची विक्री

**(१७) * ६४६७८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रायगड व मुंबईसह सर्वच शहरी व ग्रामीण भागात एनर्जी ड्रिंक्सच्या नावाखाली कॅफेनचे अतिरिक्त प्रमाण असलेली थंड पेये बाजारात विक्रीसाठी सहज उपलब्ध होत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २५० मि.ली.च्या बाटलीत ७५ मि.ली. ग्रॅमपेक्षा जास्त कॅफेन घेऊ नये अशी नोंद असतानाही याच्या सेवनामुळे जास्त नशा येऊन मेंदू, किडनी, मज्जारज्जू यावर त्याचा विपरीत परिणाम होत असून अस्वस्थता, निद्रानाश, प्रजनन समस्या, उच्चदाब, लठ्ठपणा व चिडचिडेपणाच्या व्याधींचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पेये शाळा व महाविद्यालय परिसरात सहज उपलब्ध होत असल्याने त्याचा विपरीत परिणाम नागरिक व विद्यार्थ्यांवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून आरोग्याला हानिकारक अशा एनर्जी ड्रिंक्स विक्रीवर तातडीने बंदी घालण्यासंदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) अन्न सुरक्षा व मानके (फूड प्रॉडक्ट्स ॲन्ड फूड ॲडीटिव्हज), २०११ चे नियमन २.१०.६.२(ii) अन्वये Caffeinated Beverages (Carbonated, Non-carbonated) मध्ये कॅफेनचे प्रमाण कमीत कमी १४५ मिली ग्रॅम प्रति लिटर आणि जास्तीत जास्त ३०० मिली ग्रॅम प्रती लिटर असावे, अशी तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतूदीत नमूद केलेल्या प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणात कॅफेन घेतल्यास अनेक व्याधी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तथापि, अन्न व औषध प्रशासनाकडून संपूर्ण राज्यात, शाळा व महाविद्यालय परिसरात विक्री केल्या जाणा-या एनर्जी ड्रिंक्सची वेळोवेळी तपासणी केली जात असून नियमानुसार या प्रकरणी पुढील कार्यवाही केली जात आहे.

(४) अन्न सुरक्षा व मानके (फूड प्रॉडक्ट्स ॲन्ड फूड ॲडीटिव्हज), २०११ चे नियमन २.१०.०६ अन्वये BEVERAGES NON-ALCOHOLIC अन्न पदार्थांमध्ये caffein या घटक पदार्थांचे प्रमाण निश्चित केले आहे. सदर अन्न पदार्थात caffein हा घटक पदार्थांचे प्रमाण निश्चित केलेल्या प्रमाणानुसार आहे किंवा कसे हे तपासण्यासाठी नियमितपणे अन्न नमुने विश्लेषणासाठी घेतले जातात. विश्लेषण अहवालाच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ मधील नियमानुसार वेळोवेळी उचित कारवाया केल्या जात असल्याने एनर्जी ड्रिंक्सच्या विक्रीवर बंदी घालण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर व सिंधुदुर्ग जिल्हयातील एक शिक्षकी शाळा बंद होत असल्याबाबत

**(१८) * ६४९३५ श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.निलेश लंके (पारनेर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा परिषदेच्या ४७६ शिक्षकांच्या जिल्हयाबाहेर बदली करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यामुळे १०० एक शिक्षकी शाळा बंद होण्याच्या मार्गावर असून ३०० पेक्षा जास्त शाळा एक शिक्षकी होणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये देखील ७५८ शिक्षकांची आंतरजिल्हा बदलीमुळे तेथील विद्यार्थ्यांचे शिक्षकांअभावी नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्हयातील २३२१ शाळांमधील ७ हजार २९२ शिक्षकांच्या पदांना मंजूरी दिली असून त्यापैकी २ हजार ७ पदे रिक्त आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच पालघर जिल्हा परिषद शाळेच्या कंत्राटी शिक्षकांना निधीअभावी मुदतवाढ देण्यात येत नसल्यामुळे शिक्षकांअभावी सुमारे ४१ शाळांमधील ८२ वर्ग बंद करण्याची वेळ आल्याने इयत्ता नववी व दहावी मधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील ४५६ शिक्षकांना आंतरजिल्हा बदलीने कार्यमुक्त करण्यात आल्यामुळे सद्य:स्थितीत १२८ शुन्य शिक्षकी शाळा झालेल्या आहेत. सदर शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून नजीकच्या जिल्हा परिषद परिषद प्राथमिक शाळांमधील शिक्षकांची शुन्यशिक्षकी शाळांवर पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली आहे.

(३) पालघर जिल्हा परिषदेच्या एकूण-२११९ शाळा आहेत. संच मान्यता २०२२-२३ नुसार एकूण-७१४७ मंजूर पदे आहेत. त्यापैकी ५२६० इतकी पदे कार्यरत असून १८८७ पदे रिक्त आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) पालघर जिल्हा आदिवासी बहुल असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून सन-२०१७ ते २०२२ या कालावधीतील पालघर जिल्ह्यातून आंतरजिल्हा बदली झालेल्या ४८६ प्राथमिक शिक्षकांना आजतागायत कार्यमुक्त करण्यात आलेले नाही.

तसेच पालघर जिल्हा परिषदेच्या इयत्ता १ ते ८ वी उच्च प्राथमिक शाळेस जोडून इयत्ता ९ वी व १० वी असलेल्या एकूण-४१ शाळा आहेत. सदर शाळांमध्ये जिल्हा परिषद, पालघर यांनी गणित विषयाकरिता-२९, इंग्रजी विषयाकरिता-२६, विज्ञान विषयाकरिता-३४ असे एकूण-८९ शिक्षकांना जिल्हा परिषद सेस पंडा अंतर्गत मानधन तत्वावर नेमणूका दिलेल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्यात आलेली आहे.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१९) * ६५१६९ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाचे काम अनेक वर्षापासून प्रलंबित असल्याने तेथे अपघाताच्या प्रमाणात वाढ होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम तातडीने व कालबध्द मर्यादेत पूर्ण करण्याच्या मागणीसाठी दिनांक ०१ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास वडखळ ते नागोठणे येथील पत्रकार व नागरीकांनी लाँगमार्च काढून आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक ३१ मे, २०२३ पर्यंत मुंबई-गोवा महामार्गावरील एका बाजूची मार्गिका पुर्ण करण्याचे आश्वासन शासनामार्फत देण्यात येवूनही त्याची अद्याप अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबई-गोवा मार्गावरील राजापूर नजीक कोदवली पेट्रोलपंपाजवळील एकच मार्ग सुरु असल्याने तेथे वारंवार अपघाताच्या घटना घडत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई-गोवा महामार्गाचे काम तात्काळ पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.
मुंबई गोवा महामार्गाची पनवेल ते इंदापूर ही ८४ कि.मी.लांबी केंद्र शासनाचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत व इंदापूर ते झाराप ही ३५५ कि.मी. लांबी राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.) विभागाचे अखत्यारीत आहे.
(२) वडखळ ते नागोठणे महामार्गाचे काम सुरु असल्याने दि.०१.०५.२०२३ रोजी नियोजित असलेले आंदोलन येथील पत्रकार व नागरीकांनी मागे घेतले.
(३) अंशत: खरे आहे.
पनवेल ते इंदापूर या लांबीमध्ये १४.५० कि.मी. लांबीचे डाव्या बाजुकडील एका मार्गिकेचे व्हाइट टॉपिंगचे काम पुर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीत आहे. तसेच इंदापूर ते झाराप या लांबीमध्ये २६४.६० कि.मी. लांबीचे चौपदरीकरणाचे काम पुर्ण झाले असुन उर्वरित लांबीमध्ये काम प्रगतीत आहे.
(४) अंशत: खरे आहे.
सदर ठिकाणी अस्तित्वातील उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्यांचे स्थलांतरण जागेच्या उपलब्धतेअभावी प्रलंबित राहील्यामुळे महामार्गावरील दोन्ही बाजुकडील वाहतुक एकाच बाजूने वळविण्यात आली होती. या ठिकाणी अपघात टाळण्याच्या दृष्टीने रस्ते सुरक्षेच्या आवश्यक सर्व उपाययोजना उदा. माहिती फलक उभारणे/गतीरोधक टाकणे इ. करण्यात आल्या आहेत.
(५) उच्च दाबाच्या विद्युत वाहन्या स्थलांतरीत करण्यासाठी आवश्यक असलेल्या अतिरिक्त जागेचा प्रश्न सद्यस्थितीत मार्गी लागलेला असुन लवकरच वाहीन्या स्थलांतरीत करुन सदर ठिकाणी दुहेरी वाहतुक सुरु करण्याचे नियोजन आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिवभोजन थाळीच्या केंद्र चालकांना देयके अदा करण्याबाबत

**(२०) * ६४६१७ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.यशवंत माने (मोहोळ), डॉ.राजेंद्र शिंगणे (सिंदखेड राजा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गरीबांसाठी सुरु करण्यात आलेल्या शिवभोजन थाळी योजनेंतर्गत दुरुपयोग टाळण्यासाठी लाभार्थ्यांचे थाळीसह फोटो काढून वेबसाईटवर अपलोड करणे केंद्र चालकांना बंधनकारक करण्यात आले असून त्याचे पालन न झाल्यामुळे अनेक केंद्र चालकांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकीकडे केंद्र चालकांना नोटीसा बजावण्यात आल्या असतानाच राज्यातील हजारो केंद्र चालकांची गत ६ महिन्यापासून देयके प्रलंबित असून त्यांना अनुदानाचे प्रदान वेळेत न झाल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र चालकांची देयके विनाविलंब मिळणेबाबत शासनाने मानक कार्यप्रणाली अंतर्गत एसओपी निश्चित करण्याचा निर्णय घेऊन त्यानुसार स्थापन करण्यात आलेल्या समितीने शासनास अहवाल सादर केला आहे काय,
(४) असल्यास, सदरहू योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे होवून केंद्र चालकांना वेळेत अनुदान मिळावे तसेच योजनेतील गैरप्रकार टाळण्यासाठी अटी शर्ती व निकषांमध्ये आवश्यक बदल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येते,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.
राज्यामध्ये सध्या एकूण १५५४ शिवभोजन केंद्र कार्यरत आहेत. राज्यात गरीबांसाठी सुरू करण्यात आलेल्या शिवभोजन थाळी योजनेंतर्गत दुरूपयोग टाळण्यासाठी लाभार्थ्यांचे थाळीसह फोटो काढून वेबसाईटवर अपलोड करणे केंद्र चालकांना बंधनकारक करण्यात आलेले नाही.
त्याचप्रमाणे सर्व जिल्हा पुरवठा कार्यालय/ अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय/शिधावाटप परिमंडळ कार्यालये यांना आवश्यक निधी वितरीत करण्यात आलेला असून केंद्र चालकांची गत ६ महिन्यापासून देयके प्रलंबित नाहीत.
शिवभोजन केंद्रचालकांना देयके विनाविलंब मिळण्याच्या दृष्टीने मानक कार्यप्रणाली निश्चित करण्यासाठी अन्न नागरी पुरवठा व, ग्राहक संरक्षण विभाग शासन निर्णय क्र. -शिभोथा-१३२३/प्र.क्र.८५/नापु-१७ दि. २८.०४.२०२३ नुसार गठीत केलेल्या समितीने दि. १५.०५.२०२३ रोजी त्यांचा अहवाल सादर केला, सदर अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे
(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## कुरखेडा (जि.गडचिरोली) येथील केंद्र प्रमुख यांनी बारावीच्या परिक्षेत कॉपी करण्यासाठी विद्यार्थ्यांकडून लाच घेतल्याबाबत

**(२१) * ६४८३० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरखेडा (जि.गडचिरोली) शहरातील एका कनिष्ठ महाविद्यालयाच्या बारावीच्या परिक्षेत कॉपी करु देण्यासाठी सहा विद्यार्थ्यांकडून प्रत्येकी एक हजार रुपये घेतले असल्याचे माहे मार्च, २०२३ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांनी पैसे देतानाचा व्हिडीओ काढून समाजमाध्यमांवर व्हायरल केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) संबंधित केंद्र प्रमुखाविरुध्द कुरखेडा, जिल्हा गडचिरोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मरीन ड्राइव्ह (मुंबई) येथील सावित्रीबाई फुले वसतिगृहात राहणाऱ्या तरुणीची झालेली हत्या

**(२२) * ६४७५८ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील मरीन ड्राइव्ह परिसरातील सावित्रीबाई फुले वसतिगृहात राहणाऱ्या तरुणीवर वसतिगृहाच्या सुरक्षा रक्षकानेच अत्याचार करुन तिची हत्या केल्याचे दिनांक ६ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू घटना अत्यंत गंभीर असून राज्यातील महिला वसतिगृहांच्या एकूणच सुरक्षिततेवर प्रश्न निर्माण करणारी असून याची गंभीर दखल घेत उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी राज्यातील सर्व शासकीय वसतिगृहांची सुरक्षा तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी "रुसा" (राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियान) चे राज्य संचालक यांच्या एक सदस्यीय समितीचा अहवाल तात्काळ सरकारला सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये तसेच वसतिगृहातील महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भात उपाययोजना करुन या वसतिगृहांचे सुरक्षा ऑडीट करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, सदरहू प्रकरणातील संबधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) सावित्रीदेवी फुले महिला वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थीनीवर अत्याचार करुन तिची हत्या केल्याची बाब दि. ६ जून, २०२३ रोजी निदर्शनास आली, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
शासन निर्णय दि. ७ जून, २०२३ अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय वसतीगृहांच्या सुरक्षेच्या आढावा घेणेबाबत संचालक, उच्च शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.
(३) व (४) प्रस्तुत घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने सदर घटनेची चौकशी करण्यासाठी शासन निर्णय दि. ८ जून, २०२३ अन्वये राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान, मुंबई व कुलगूरु, एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ, मुंबई यांची व्दिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली.
त्याचबरोबर सर्व शासकीय वसतिगृहांची सुरक्षा तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी शासन निर्णय दि. ७ जून, २०२३ अन्वये समिती स्थापन करण्यात आली.
सदर समितीने सादर केलेल्या अहवालास अनुसरुन सर्व वसतिगृहांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून वसतिगृहांच्या परिसरात अद्ययावत सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्याच्या निर्देशासह अन्य करावयाच्या उपाययोजनांबाबत शासन निर्णय दि. २८ जून २०२३ अन्वये विस्तृत निर्देश देण्यात आलेले आहेत.
(५) सावित्रीदेवी फुले महिला वसतिगृहाच्या अधिक्षीका यांना शासन आदेश दि. १६ जून, २०२३ अन्वये निलंबित करण्यात आले आहे.
तसेच प्रस्तुत घटनेसंदर्भात मरीन ड्राईव्ह, पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ११९/२०२३ भा.द.वि. च्या कलम ३०२, ३७६ (२) (ड) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील शिधापत्रिका लाभार्थ्यांना मासिक धान्य कोटा कमी मिळत असल्याबाबत

**(२३) * ६५२५३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील अन्न धान्य पुरवठा विभागातील अधिका-यांच्या मनमानी व आडमुठे धोरणामुळे शिधापत्रिका लाभार्थ्यांना मासिक धान्य कोटा कमी मिळत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रास्तभाव धान्य दुकानदारांनी लाभार्थ्यांचे आधार क्रमांक व बँक खाते ईआरसीएमएस मध्ये सिडींगकरिता उपलब्ध न केल्याने पुरवठा अधिका-यांनी रास्तभाव धान्य दुकानदारांचा धान्य कोटा कमी केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १७ फेब्रुवारी २०१६ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार रास्तभाव दुकानदारांनी लाभार्थ्यांचे आधार क्रमांक व बँक खाते क्रमांक ईआरसीएमएसमध्ये सिडींगकरिता उपलब्ध न केल्यास त्या दुकानदारांचे प्राधिकार पत्र रद्द करण्यात येऊ नये तसेच रास्तभाव दुकानदारांचा कोटा देखील कमी करण्यात येऊ नये अशा सुचना केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (का.),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.